म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १०८

# सार्वत्रिक मुळशी सत्याग्रह

# मेळ्याचीं पदें.



किंमत २ आणे.

# दोन शब्द.

धर्मावतार श्री शिवाजीच्या मावळ्यांची मुळशी हें हिंदूचें धर्मक्षेत्र अथवा खिलाफत आहे. या धर्मक्षेत्रांतून १०००० मावळ्यांची हकालपट्टी करून हें क्षेत्र, धरण बांधून, बुडविण्याचा सरकारचा व टाटा कंपनीचा बेत झाला आहे. या प्रसंगीं महाराष्ट्रांतील हिंदुमुसलमानांनीं धांवून आलें पाहिजे. आमच्या धर्मक्षेत्रासाठीं सर्वत्र महाराष्ट्रभर सरकारच्या कचेऱ्या ठिकठिकाणीं अडवून सरकारशीं सत्याग्रह करावयाचा आहे. टाटा कंपनीशीं धरणावर व दुसरीकडे तिचे कारखाने आहेत तेथें सत्याग्रह करावयाचा आहे. या सत्याग्रहाच्या कार्यास मदत करण्याला येथील गोरक्षण, सत्याग्रह, सन्मित्र व गजानन मेळ्यांतील मंडळी पुढें आलीं आहेत. याबद्दल आम्ही त्यांचें अभिनंदन करतों. सदरील चार मेळ्यांतील कांहीं मंडळी एकत्र होऊन सार्वत्रिक मुळशी सत्याग्रह मेळा तयार झालेला आहे. या मेळ्याला ऐक्यवर्धक, कसबा गणपती, गजानन, टिळकरोड सत्याग्रह व महाराष्ट्र या मेळ्यांनीं आपलीं पदें देऊन मदत केलेली आहे. या मदतीबद्दल सदरील मेळ्यांचे आम्हीं आभारी आहों. सार्वत्रिक मुळशी सत्याग्रह मेळ्याच्या द्वारां मुळशीकरांची कहाणी सर्वांना ऐकविली जात आहे. ती ऐकून घेऊन सर्वांनीं यथाशक्ति माणसांची व पैशाची हस्तें परहस्तें मदत करावी अशी प्रार्थना आहे. सत्याग्रहकार्याची विशेष माहिती कचेरींतून मिळवावी.

चिटणीस

**सार्वत्रिक मुळशी-सत्याग्रह-मंडळ.**

# मुळशीपेटासंवाद.

## पद १ लें.

( चाल—बाळा तूं कोठें जाशी )

सत्याग्रही—कां पंत निघाला कोठें । गडबडींत दिसतां मोठे ॥
या बसा असे या स्थानीं । भेटला बहुत दिवसांनीं ॥
कां खुशाल आम्ही सगळे । कावेंत कसलें भेंडोळें ॥
पंत— जातसे उदर भरण्याला । कॅमेरॉन इंजिनियराला ॥
अर्ज हा द्याया । टाटाचा नोकर व्हाया ॥ १ ॥
सत्या०—हा, हाय काय हें वदतां । मज विवेकमूढ जणुं गमतां ॥
निपजुनी विप्रवरवंशीं । धरितसां क्षुद्र मार्गासी ॥
परदास्या टाकुन द्यावें । सत्याग्रह करण्या यावें ॥
पंत— भलतेंच बोलतां कांहीं । उद्योग तुम्हांला नाहीं ॥
मूर्ख मज गमतां । गरिबांचें अनहित करितां ॥ २ ॥
सत्या०—मावळे बंधु बहु शूर । शिवराज शूर सरदार ॥
प्राणांची आहुति दिधली । महाराष्ट्र लाज राखियली ॥
वडिलार्जित जमिन जणुं आई । कंपनी हिरावुनी घेई ॥
पंत—बहु मूढ गमतसां मजला । कंपनी देइ द्रव्याला ॥
हट्ट हा सोडा । बहु द्रव्य यशाला जोडा ॥ ३ ॥
सत्या०-बोलणें दुष्ट मज गमतें । अति दुःख मनाला होतें ॥
जी भूमि जन्म हा देई । प्राणाहुनि प्रिय ती आई ॥
ती माय विकुनियां पैसा । मिळवुनि लाभ हो कैसा ? ॥
पंत— व्यवहारशून्य तुम्ही दिसतां । अज्ञान मुखानें वदतां ॥
तथ्य मुळीं नाहीं । जाऊं द्या झाली मज घाई ॥ ४ ॥
सत्या०—करुं नका राव अविचारा । धन लोभ त्यजा हा सारा ॥

अन्नु ही थोर या जगतीं । परब्रह्म काय संपत्ति ? ॥
कुलटाहि द्रव्य मिळवीते । निज देह (कुलशील)विक्रया करिते
पंत— कंपनी द्रव्य देईल । मावळे सुखी होतील ॥
कर्ज वारोनी । मुंबईला मग जावोनि ॥ ५ ॥
सत्या०—मुंबई विनाशा नेते । व्यसनांत जना बुडवीते ॥
कायदेशीर दास्यहि तें । गरिबांस परि न हें कळतें ॥
ना जमिन, द्रव्य ना टिकतें । पतिपत्नि उपाशी मरते ॥
पंत— बहुतांचें हित साधाया । जावोत कांहिं जन वायां ॥
प्रगति होईल । निज देश पुढति जाईल ॥ ६ ॥
सत्या०—प्रगतिचें सर्व थोतांड । धनिकांचें असें हें बंड ॥
परकीय धनेशहि येथें । येउनी घेत सत्तेतें ॥
गरिबांची लुबाडुनि मत्ता । देति हे तयांना लत्ता ॥
पंत— धरण हें वीज देईल । उद्योगवृद्धि होईल ॥
स्वदेशाकरतां । मावळे मरूं द्या आतां ॥ ७ ॥
सत्या०—जरि देशदैन्य जाईल । मावळा प्राण देईल ॥
हा प्रश्न मृत्युचा नाहीं । धनिकांचें हित बहु होई ॥
मावळ्यां टाटा बुडवील । मोटारी स्वतः उडवील ॥
पंत—सत्य हें वचन मज गमतें । परि उपाय दिसेना यातें ॥
कंपनी मोठी । सरकार असे तिजपाठीं ॥ ८ ॥
सत्या०—हे दिवस लोकशाहीचे । दिवस हे असहयोगाचे ॥
सरकार कंपनीसाठीं । जगदीश मावळ्यांपाठीं ॥
यश मिळेल सद्धर्माला । भगवंत देत ग्वाहीला ॥
पंत— कंपनी द्रव्य ओतील । मावळे लुब्ध होतील ॥
सर्व निरुपाय । सत्याग्रह ऑफस होय ॥ ९ ॥
सत्या०—मावळे पुत्र थोरांचे । तानाजि बाजि शिवबाचे ॥

स्वातंत्र्य स्वधर्मासाठीं । पंचही प्राण अर्पीती ॥
निजप्राण धरणिं देतील । परि सत्व कधिं न हरतील ॥

पंत— काळ तो निघुनियां गेला । मनु अवघा नूतन आला ॥
निराशा दिसते । निःसत्व जगत हें गमतें ॥ १० ॥

सत्या०—काळ हा लोकमान्यांचा । हा मनू महात्माजींचा ॥
काळ हा स्वकर्तव्याचा । करिल जो पराक्रम त्याचा ॥
परि श्रद्धा मनिं मुळीं नाहीं । नामर्द दिसतसां मजही ॥

पंत— बांधवा क्षमा करि मजला । परदास्य विचारहि त्यजिला ॥
कधिं न जाईन । पोटांत कंटका भरिन ॥ ११ ॥

..व स०—परदास्यविनाशासाठीं । गरिबांना घालुनि पाठीं ॥
निजप्राण करिं घेऊन । भगवंतपदातें स्मरुन ॥
संकटीं उडी मग घेणें । शिवछत्रपतीचें लेणें ॥

बाळ— स्वीकार तयाचा करुनि । गणराय नाम घेवोनि ॥
मुळशिला जाऊं । सत्याग्रह करुनी दावूं ॥ १२ ॥

### पद २ रें.

( चाल—सबसे राम )

रणशूर मावळ्यांनो आली वेळ कसोटीची ॥ ध्रु० ॥
राजशिवाजी तान्हाबाजी जिथें होऊनि गेले
त्यांचे वंशज तुम्ही आजला काय पाहिजे केलें ॥ १ ॥
जसा काळ ये तसा खेळ रे सदैव खेळावा
इतिहासाचा धडा असा हा कार्यीं योजावा ॥ २ ॥
चहूंकडोनी मार्ग खुंटला उपाय शेवटला
सत्याग्रह हा पवित्र ठरला तोड दुजी ना त्याला ॥ ३ ॥
ज्या भूमीनें महाराष्ट्राला आजवरी पोशियलें
तिचें संकटीं रक्षण करणें कर्तव्यकर्म आपुलें ॥ ४ ॥

मायभूमिला बुडवुं पहाती करुनि नासधूस
घरा पोखरावया शिरे ही टाटा कंपनी घूस ॥ ५ ॥
प्रतिकार कराया घेऊनि हातीं सत्याग्रह भाला
एकजुटीनें तुम्हि असतांना कोण बांधी धरणाला ॥ ६ ॥
मायभूमिचे पांग फेडण्या समय हाचि आला
ह्याच कारणें सर्व मराठा आज होउं द्या गोळा ॥ ७ ॥
निःशस्त्र प्रजेवर नाहक कोणी बंदूका उचलील
सत्याग्रही चळवळ त्यातें नमावया लावील ॥ ८ ॥
धनीपणाचा हक्क हिरावुनि मजुर तुम्हां करणार
स्वचैनिखातर देशोधडिला तुम्हां लावणार ॥ ९ ॥
मातृभूमिच्या कल्याणास्तव जरी मरावें लागे
डरे न कवणा वीर मराठा कधीं घेइना मागें ॥ १० ॥
हम् करेसो असे कायदा आज बोकळे फार
आज उद्यांना काळ तयातें नरम खास आणणार ॥ ११ ॥
सत्याग्रह हा पाळित असतां गगनसुखें कोसळुं दे
संत तुकोबा काय सांगती निश्चय बल फल दे ॥ १२ ॥
ज्या बाजूला सत्य वसतसे योगेश्वर तिकडे
मंथुनि गीता श्री टिळकांनीं हेचि शिकविले धडे ॥ १३ ॥
निश्चय पक्का गमवु न हक्का आम्हि मराठे भाई
मुळशी पेटा बुडूं न देऊं मरूं त्याच पायीं ॥ १५ ॥

## पद ३ रें.

चाल–(सत्याची धरावी कास)

भाइहो रडत बसणार, तुम्हा धिक्कार ॥
कां ? धन्य मावळा वीर मराठा नांव आज बुडणार ॥ ध्रु० ॥
तलवार भवानी माय तरणोपाय ।
ही परावलंबी भारत माता आज जाहली हाय ॥ १ ॥

हे कर्मविराचे बोल असती विनमोल ।
हृदयस्पर्शी जाऊनी भिडती अंतःकरणीं खोल ॥ २ ॥
भारता कधीं उठणार, भूमिला भार ।
माय भूमि तुज हांक मारिते झोंप कधीं सरणार ॥ ३ ॥
चाल--चहुंकडे पेटला देश, राष्ट्राचा होतो नाश ।
चल उठे नसे अवकाश ।
घे कर्मयोग तलवार रिपू संव्हार ।
अविनाश उभा द्वारांत षंढहो काय जगुनि करणार ॥ ४ ॥

पद ४ थें.

(चालः—कटाव.)

लइ वंगाळ, वकुत औंदा, लोक संमदा,
झाला बेजार । झाला बेजार ।
संकटें पुढें ही उभीं सदा तय्यार ॥ ध्रु० ॥
सरकार, करीना विचार, सर्व अविचार,
कंपनी टाटा । कंपनी टाटा ।
सर्वस्व जीवितावरि फिरवि वरवंटा ॥ १ ॥
मुळशींत बांधिति धरण, आमुची जमिन,
जाय त्या पायीं । जाय त्या पायीं ।
कां होणार आमुची कायम अंगाई ॥ २ ॥
पूर्वापार, मायभू आई, पोटापाण्या देई,
तिचेवर घाला । तिचेवर घाला ।
हा प्रसंग दारुण आज पहा ओढवला ॥ ३ ॥
छप्पन गांवांत, कोणि राहूं नये, कांहीं ठेऊं नये ।
देशोधडीं जावें । देशोधडीं जावें ।
कुणिकडुनि टाटाला धरण बांधूं द्यावें ॥ ४ ॥

येसुतान्हा, शिवाजीराजी, जाहले गाजि,
ह्याच भूमींत। ह्याच भूमींत।
त्या सिंहगडादिक गड हे साक्षीभूत ॥ ५ ॥

धरणावर, आम्हि बसून रहाणार, नाहीं बांधुं देणार,
मराठा छावा। मराठा छावा।
तो परंपरेचा लढविल गनिमी कावा ॥ ६ ॥

साहेबांची, बाजू धरि टाटा, इकडे दावि खोटा,
देश अभिमान। देश अभिमान।
हा डाव टाकुनी बांधूं पहातो धरण ॥ ७ ॥

आम्ही धनी, आमच्या जमिनिचे, कुणी जर तिचे,
नुकसान करूं पाहील। नुकसान करूं पाहील।
हा मावळा मराठा शासन त्या देईल ॥ ८ ॥

महात्मा गांधी, काढी सत्याग्रह, झाला अनुग्रह,
संत अवतरला। संत अवतरला।
ह्या हिंदभूमिचें दैन्य घालवायाला ॥ ९ ॥

सत्याग्रह, पंथ बहू विकट, असे त्या अटक,
अनत्याचार। अनत्याचार।
परि आजि आम्हाला हाच होय आधार ॥ १० ॥

केला निर्धार, सत्याग्रह करणार, नाहीं बांधुं देणार,
टाटाला धरण। टाटाला धरण।
त्या पायीं अम्हाला खुशाल येवो मरण ॥ ११ ॥

विघ्नहरा, मोरया धाव, आम्हांला पाव
संकटां वारी। संकटा वारी।
ह्या सत्याग्रहिं तं साह्य करी निर्धारि ॥ १२ ॥

पद ५ वें.

चाल-( फटका )

मुळशी पेटा चौपन गांवें बुडवूं पाहे सरकार !
न कळे इरइर किती कुटुंबें देशोधडिला जाणार ॥ १ ॥
कोठुनि आतां भात सुवासिक, तांदुळ खावा रंगून ।
मुंबापुरिनें तथापि जावें आनंदानें रंगून ॥ २ ॥
राजनिष्ठ जन म्हणुनी कां हो गरिबावरि हे उपकार ।
शिवरायाचे गडी मावळे सत्यासाठीं मरणार ॥ ३ ॥
अनेक शतकें बसलों जेथें द्यावें स्थल तें केवि परा ।
मायभूमिचा वियोग नलगे प्राणहि गेला तरी बरा ॥ ४ ॥
घेउनि अमुचि भूमी तीचे सेवक व्हाया उपदेश ।
करिती उलटा साहे कैंवी दयानिधी हे परमेश ॥ ५ ॥
कढत ओतिलें जलही माथां डरले परि ते नच वीर ।
घाण टाकिली अंगावरि परि शांति जयांची आनिवार ॥ ६ ॥
टाटा मोठा म्हणुनि सोटा मारुनि अमुचा हा तोटा ।
खरेंचि पोटा बसला चिमटा प्रसंग आला हा खोटा ॥ ७ ॥
धैर्य दाविहश्या असेंच पुढती कार्य निश्चयें होणार ।
शिवरायातें स्मरोनि चित्तीं पाय न मागें सरणार ॥ ८ ॥

पद ६ वें.

चाल-(सबसे रामभजन )

रणमर्द मराठ्यांनो हर हर महादेव बोला ॥ ध्रु० ॥ कैक पिढ्या परि ज्या भूमीनें तुम्हा वाढविलें, निमकहरामचि तिजसी होणें ब्रीद नव्हे आपलें ॥ हर हर महादेव बोला ॥ १ ॥ श्रेष्ठ कथिति स्वर्गाहूनीही जननि जन्मभूमी, तिजवरी येता घाला घोराचि स्वस्थाचि बसतां तुम्ही ॥ २ ॥ षंढ असे नामर्द असे कां तुम्ही सर्वही बनला, बाइल होउनि

बलात्कर हा पहात कसे बसला ॥ हरहर ॥ ३ ॥ ज्या भूमीनें शिव-प्रभू हा वीराचि निर्मीला, तीच पुण्यभू वांझ जहाली, कलंक हा आला ॥ हरहर ॥ ४ ॥ तानाजीनें ज्या मर्दानें अचाट कृत्यें केलीं, त्याचे वंशज आम्ही म्हणवितां लाज कुठें गेली ॥ ५ ॥ प्राणापरी हे जपति अब्रुला शूर वीर धीर, अब्रूसाठीं प्राणहि त्यजिती महाराष्ट्र वीर ॥ ६ ॥ शतक एकही नाहिं लोटलें स्वराज्य भोगुनिया, अटकेपाराचि झेंडा रोवूनि गाजविलें वीर्या ॥ ७ ॥ सिंधुमध्यें घोडे न्हाले मर्द मावळ्यांचे, ऐसे गाती पोंवाडे हो स्मरण करा त्यांचें ॥ ८ ॥ धनाजि संताजी हे सलिलीं शत्रूंना दिसती, ऐशी ज्यांनीं वचक बसविली राखा त्यांची कीर्ति ॥ ९ ॥ टाटा केवळ भोंदू मोठा पोटार्थी टपला । बकापरी हा महाराष्ट्र भू गट्ट कराया बसला ॥ १० ॥ सत्याग्रह हा महाराष्ट्र नर-नारिंनो करूं, या शांततेनें राष्ट्रभूमीचे रक्षण करण्या झटूं या ॥ ११ ॥ हरहर ॥

## पद ७ वें.

चालः–( हा नारायण अडला )

मर्द हो मरणभीति सांडा, टाटा कंपनीशीं भांडा ॥ ध्रु० ॥ या टाटानें मावळप्रांतीं येऊनि ठाणें दिधलें, दीन मावळ्या हतबल करुनी त्राही भगवन् केलें ॥ १ ॥ वीर विनायक नाम भुस्कुटे मुळशी प्रांतीं गेला, गरीब मावळा धीर देऊनि निर्भय त्यानें केला ॥ २ ॥ उपाय थकले मार्ग संपले, सावध करण्या अरिला, इलाज नुरला म्हणुनि मुळ-शिनें सत्याग्रह हा वरिला ॥ ३ ॥ सत्याग्रहसम अमोघ अस्त्र न साध्य दिसे या जगतीं, याच शक्तिला टाटा भ्याला खुंटली त्याची प्रगति ॥ ४ ॥ 'हात जोडतों, पैसा देतों' विनती त्यानें केली, ऐकुनि त्याच्या छाद्मि भाषणा घोर गर्जना झाली ॥ ५ ॥ नलगे, नलगे त्रिवार नलगे द्रव्य आम्हां हा कावा, कळला कळला टाटा बंधुनो आग तया लावा ॥ ६ ॥ नीच नराधम धन मिळवीती निजमातेला विकुनी, धिक्धिक्

त्यांचें जीवित त्यांनीं व्यर्थ शिणविली जननी ॥ ७ ॥ शिवाजि बाजी तान्हाजिचा मर्द मराठा बच्या, नोहे कच्चा रणगाजी तो मरण येई तरि सच्चा ॥८॥ जान देऊं परि जामिन न देऊं हीच प्रतिज्ञा आम्ही, करितों साक्षी ठेवुनी भगवन् जोतिरुपेश्वर स्वामी ॥ ९ ॥ परिसुनि ऐशी घोर प्रतिज्ञा कंपनी कंपित झाली, सरकारातें शरण रिघे मग अन्य न तिजला वाली ॥ १० ॥ सरकारें मग स्वहित साधण्या अभय तिला झणिं दिधलें, विनाशकाले विपरित बुद्धी सार्थ वचन हें केलें ॥ ११ ॥ पाठी बांधुनी कंपनीटाटा वदला सर अधिकारी, मत्ता तुमची सत्ता आमची ध्यानिं असो द्या भारी ॥ १२ ॥ सत्तेच्या या अतुल बलानें हकलुनि तुम्हां देऊं, सत्तेपुढतीं सत्य न टिकतें न्याय जगाला दावूं ॥ १३ ॥ ऐकुनि ऐशी व्यर्थ वल्गना वीर विनायक वदला, हा हा बंधो थांब जरा तरि ईश न अजुनि निजला ॥ १४ ॥ असेल सत्ता तुझिया हातीं सत्य असे मज जवळीं, या सत्याच्या महाप्रभावें दुनिया उलथिन सगळी ॥ १५ ॥ नसांनसांतुनि या वीरांच्या रक्त शिवाचें अजुनी, सळसळ करितें प्राण घेशिं जरि देति न तुजला जामिनी ॥ १६ ॥ तिलकशिष्यवर पुणेकरांनों ध्यानिं धरा ही वाणी, घोडा मैदान् निकट पातलें दावा जगता पाणी ॥ १७ ॥ शब्दशूरता बहुत जहाली कार्य करुनिया दावूं, मुळशी मुळावर परदास्याच्या आणुनि अमरहि होऊं ॥ १८ ॥ हे गणराया आणिबाणीचा समय गुदरला आज, महाराष्ट्राची रक्षण करणें तुजला प्रभुची लाज ॥ १९ ॥

### पद ८ वें

'मावळ्यांची दया धरा कांहीं तरी.जी'

भगव्या झेंड्याखालीं राहुं करुं यारे निर्धार,
माय भवानी शिवरायाचा बोला जयजयकार ॥ ध्रु० ॥
मुळशीच्या ह्या इज्जतीचा चटका लागला मोठा,
माय बहिणेंची अब्रु जाई सलतो मनिं हा टाटा ॥

दलाल होऊनि लुडबुड करुनि किंमत कारितो टाटा,
परकीयांच्या भांडवलावर नखरा याचा खोटा ॥
प्राणाहुनि प्रिय जमिनि आपुल्या करा तुम्ही स्वाधीन,
शेजेचि जणु बाइल मागें टाटा मध्यस्थीन ॥
मतलब साधि बोध करोनी नका देउ तुम्ही मान,
पराकियाच्या चैनीसाठीं द्या तुम्ही इकडे ध्यान ॥
चालविला छळ भररस्त्यामधिं हात लावि अंगास,
मर्द मराठे शिवबाजीचे पाहता काय तोंडास ॥
शिवरायाचा तान्हाजीचा दोस्त मावळा फार,
आंग्ल बंधुनो जामिनिसाठीं करा आम्हाला ठार ॥
प्रलयाग्नितुनि करवा सुटका हंबरडा हा मोठा,
गोरगरिब हे मरुनि जातिल अंगिं थरारे कांटा ॥
सह्याद्रीचा बालक मुळशी नेती आज हिरोन,
खेंचा सगळे पुढें होऊनि धुळिस लोळवा छान ॥
भिंतीमध्यें तुम्हां चिनुनि बांधूं भिंत ही छान,
चंग बांधिला हित शत्रूंनीं गेले कोठें भान ॥
जालियान्‌वाला बाग आम्हाला स्वाभिमान हो शिकवी,
नका विसंबूं कोणावरही देह चितेवर ठेवी ॥
आंग्ल मैत्रिच्या विश्वासाचा अनुभव कटु हा आला,
घाला पडला सभोंवती रे घोरत कसचे पडला ॥
खंबिरवृत्ती धरुनि साचि राहु तळ देऊन,
धरण तयाचे बंद पाडणें हें आपलें जीवन ॥
असहकार तरवार परजुनि करु शत्रुला वार,
सार्थकि लावुनि जीवित सगळे थाटुया संसार ॥
सेनानायक नरसिंहाच्या धोरणि धरु विश्वास,
तिलक प्रभूच्या आशीर्वादें विजयि होऊ हमखास ॥
देशासाठीं मरुनि जाऊं सांडुनिया घरदार,
हाच सुनिश्चय सोडवि संकटीं व्हारे तुम्ही दिलदार ॥

पद ९ वें.

( चाल—तूं टाक चिरुनि ही मान )

हे असे कसे सरकार । दिना छळणार ।

बहु काकुळती येउनि विनविलें । परी करी अविचार ॥ ध्रु० ॥

कर्तव्यशून्य अधिकारी, टाटाचा पैसा भारी, त्या श्रीमंताच्या लहरी

त्या साठीं गरिब मरणार । मुळशिचा पेटा हा बुडणार ॥ १

निजदेशीं नाहीं खाया, हे इथें येति चरण्याला, मुंबई सुखें रहाण्याला

हे अप्पलपोटे थोर । पहा धनिकांची बाजू घेणार

जे गरिबांना वाचवितें, समदृष्टी पाहि रयतेतें, वाढवी नित्य अन्नातें

जे अन्ननाश करणार । असें तें नीच ठरे सरकार ॥ ३

न्यायाचा पुतळा आला, त्या न्याय कसा नच दिसला, रयतेसी लावी भीकेला

हें धरण बांधुनि काय । जनातें ठार तुम्ही करणार ॥ ४

जरी अधिकारी का आला, नच खाया मिळुद्या त्याला, तो धुडकावीत दयेला

आम्ही कान तयाचा उपटुनिया । त्या शुद्धिवरी आणणार ॥५

मावळचा मर्द मराठा, लाडका शिवाजीस मोठा, तो धरुनि तुमचा वाटा

जरि शुद्धि नये सरकार । तयाला योग्य नसे अधिकार ॥ ६

आपसांतील पाजी लोक, पाडतील फूट अनेक, घरभेदे निवडा एक

त्या लाथाडुनिया दूर धरारे । एकीची तरवार ॥ ७

आठवा शिवाजी नृपती, शत्रुला नडवा पुढती, नच अधिकाऱ्यांची भीती

ते अंध जाहले असति । तया द्या असहकारिता मार ॥ ८

सत्याचि चाड न ज्यासी, फसविलें बहुत लोकांशीं, जो न्याया देतो फाशी

त्या पाशीं विनवुनि काय । जगाला न्याय कसा मिळणार ॥ ९

आर्यांनो जागें व्हावें, स्वावलंबनासि करावें, नच जगतिं कोणा भ्यावें

तो यश देणारा भक्तसारथी । कृष्णसखा भगवान ॥ १०

घ्या सत्याग्रह शस्त्रातें, निश्चयें लढूं शत्रूंते, धरुनिया न्यायमार्गातें ।

हा भेद सकलही सोडुनि । व्हारे सत्याग्रहा तयार ॥ ११

### पद १० वें.

मुळशी सत्याग्रह करणार कां । मातेला विकणार? ॥ ध्रु० ॥
फाटाफूटी घातक मोठी द्रव्यापाठीं जाऊं नका,
मधुबोलाला भुलाल तरि हो, घर तुमचें जाणार ॥ १ ॥
स्वातंत्र्याची निवासभूमि जननी मराठे मर्दांची,
शिवबा बाजी तान्हाजींची—टाटा कां घेणार ॥ २ ॥
"कुठें ग्योलि ती इरेसरीरे अभिमान हाय कां न्हाई,
थूः तुमच्यारे जिनगानविर—जगुनि काय करणार?" ॥ ३ ॥
टाटा पाही लाटाया ती कांटा काढुनि तुमचा हो,
शूर धीर रणवीर मावळे—मजूर कां बनणार? ॥ ४ ॥
शस्त्रें नेलीं, अस्त्रें गेलीं, वस्त्रें तरि तीं राहूं द्या,
हीन दीन जरि होय मावळा—रक्त कुठें जाणार? ॥ ५ ॥
निःशस्त्राचें शस्त्रा घेउनि सत्याग्रह युद्धास करा,
असहकारिता मंत्र गांधिचा—त्रास विजय देणार ॥ ६ ॥
नोकरशाही गर्वमदानें दंडुकशाही गाजविते,
लोकशाहिचा वीर महात्मा—ठार तिला करणार ॥ ७ ॥
हाय धिक् । जिणें परतंत्राचें स्वातंत्र्यातें मिळवीन,
हिंदराष्ट्र करि हीच प्रतिज्ञा, काय विफल होणार? ॥ ८ ॥
प्रलय कालिहीं भंग न पावे खरी प्रतिज्ञा वीरांची,
मराठ्यांचि ही कीर्ति दिगंतीर—कां नाहीं जाणार? ॥ ९ ॥
स्वराज्यद्रोही नोकरशाही धावुनि टाटा साह्य करी,
फौजबंदी तोफा डागुनि—गोळिबार करणार? ॥ १० ॥
दडपशाहिच्या नंग्या नाचें कारागृहही भरणार,
मन मानेती हत्या करूनी—भीती दाखविणार? ॥ ११ ॥
स्वातंत्र्याचें रक्त सळसळें, वीरश्रीनें बाहु स्फुरे,

'हर हर' बोला धर्म युद्धिं या—कां आतां बुडणार ॥ १२ ॥
स्वराज्यसेना सुनी तुम्हाविण सेनानायक मर्दांनो,
पारतंत्र्य अरि ठार करोनी, स्वराज्य कधीं घेणार ॥ १३ ॥
त्रिखंडिच्याही इतिहासानें धुंडाळोनी कुणि दावा,
वीरश्रीची अद्भुत कृति जी—मराठाच करणार ॥ १४ ॥
चला गड्यांनो मर्द मराठे स्वातंत्र्याच्या युद्धास,
निजशौर्याच्या चमत्कृतीनें—जग विस्मित होणार ॥ १५ ॥
सत्याग्रह हें शांततेचें युद्ध अनत्याचाराचें,
प्रथम जिंकुनी विजयश्रीला—काय कृती करणार ॥ १६ ॥

### पद ११ वें.

चाल–( असा धरि छंद )

वाजवूं शिंग । सत्याग्रहीं होऊं दंग ॥ ध्रु० ॥ सत्याग्रह ही जालिम माला । सत्याग्रह ही तुरुंगयात्रा । विघ्नें पळतिल वाटा सत्रा । बांधु या चंग ॥ १ ॥ सत्याग्रह हा अमोघ बाण । सत्याग्रह हा स्वर सोपान याच उपायें राष्ट्र ज्वान । करूया सांग ॥ २ ॥ सत्याग्रह हा उत्तम खांडा । अज्ञानें या रिपुशीं भांडा । हिंसा रहिताचे युद्धा भांडा । होऊं अभंग ॥ ३ ॥ याच उपायें महात्मा गांधी । रिपुला जिंकी परदेशामधी । स्वराज्य देइल वर्षा आधी । सोडु जरि ढंग ॥ ४ ॥ मुळशी प्रांतीं टाटा आला । मर्द मावळा हतबल केला । भूमातेवरि आला घाला । मारिली टांग ॥ ५ ॥ सत्याग्रह हा मार्ग दुर्घट । तो करण्या मन लागे बळकट । व्हावें यास्तव अतिशय धीट । टाकुनि रंग ॥ ६ ॥ श्रीशिवबाचे मर्द मराठे । मरतिल मग हटणें कोठें । हिंसा विरहित कंदन मोठें । करूं सत्संग ॥ ७ ॥ सत्याग्रह हें अघटित शस्त्र । सत्याग्रह हें सात्विक अस्त्र । दीन मावळ्या छायावस्त्र । फेडितील पांग ॥ ८ ॥

१९८३९

पद १२ वें.

चाल–( धन्य शिवाजी )

माय भगिनिनो, हात जोडितों विनंति ऐकावी
भूमातेच्या कल्याणाची जागृति ठेवावी ॥ १ ॥
आज येउनी वेळ ठेपली जगणें कां मरणें,
नाश ओळखा टाटाजीला धरण बांधु देणें ॥ २ ॥
शिवरायाला जन्म देउनी जिजा धन्य झाली
येसू तान्हा बाजि धनाजी धन्य माय व्याली ॥ ३ ॥
तुम्ही मिरवितां वंशज म्हणुनी आज तयांच्या ना ?
स्वस्थ बैसणें तुम्हां न शोभे तुम्ही वीर ललना ॥ ४ ॥
झाले दुहिते मायभूमिचे आजवरी तोटे
तुम्ही काढुनी टाका येथिल वैऱ्यांचे काटे ॥ ५ ॥
टाटा कंपनि टोळधाड ही अनर्थ ओढवला
बुडवुं पहाते तुडवुं पहाते मुळशी पेट्याला ॥ ६ ॥
तुमचे भाऊ सगेसोयरे पतीदेव आज
पडले बाहेर रक्षण करण्या मायभूमिची लाज ॥ ७ ॥
हा सत्याग्रह करावयाला करा तुम्ही साह्य
सान थोरही वदाति पुढारी पंथ हाचि ग्राह्य ॥ ८ ॥
जे जे कोणी साह्य करीती टाटा कंपनिला
त्यांना अडवा चहूंकडोनी बहिष्कार घाला ॥ ९ ॥

---

प्रकाशक—गजानन नारायण कानिटकर,
३४१ सदाशिव पेठ, पुणें.

मुद्रक—गोपाळ बळवंत जोशी, आनंद छापखाना,
३३० सदाशिव पेठ, पुणें.